कोळशेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ४० /२०२६ दि. 23/०२/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालीकेच्या कार्यक्षेत्रातील व कोळशेवाडी वाहतूक उपविभाग हद्दीतील पी. ॲण्ड टी. कॉलनी रोड, किंग्स् क्रॉस रोड, होली एन्जल स्कुल रोड डोंबिवली पूर्व येथील अरूंद रस्ते, शाळा/विद्यालये यांचे प्रवेश व निकास मार्गावर वाहतूक कोंडी होत असते. पी.ॲण्ड टी कॉलनी रोड ते किंग्स् क्रॉस रोड – होली एन्जल स्कुल रोड येथे कल्याण डोंबिवली म.न.पा अंतर्गत अरूंद रस्ता असून स्थानिक रहिवाशी यांची वाहने रस्त्यावर पार्कींग करत असतात. त्यामुळे होली एन्जल स्कूल, रॉयल इंटरनॅशनल स्कूल या शाळेच्या बसेस, स्कूल व्हॅन अडकून पडतात. परिणामी सदर दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेत पोहचण्यास विलंब होत असल्याच्या वारंवार तक्रारी पालक व विद्यालयाकडून होत असुन नमुद पी. ॲण्ड टी. कॉलनी रोड, किंग्स् क्रॉस रोड, होली एन्जल स्कुल पर्यत रस्त्याचे दोन्ही बाजुस नो पार्कींग करणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

अ.क्र.	ठिकाण	प्रकार	अंतर	वेळ
१	पी. ॲण्ड टी कॉलनी चौक ते किंग्स् क्रॉस रोड – होली एन्जल स्कुल प्रवेशद्वार पर्यतच्या रस्त्याचे दोन्ही बाजूस	नो पार्किंग	५०० मीटर	२४ तास

वर नमूद ठिकाणी **पार्किंग व्यवस्था** बाबत अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

– नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

– ठाणे पोलीस पत्रक

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.